MHND100018882022

दाखल दिनांक : १५.१०.२०२२

नोंदणी दिनांक : १५.१०.२०२२

निकाल दिनांक : ०२.०५.२०२४

कालावधी १–व.६–म.१८–दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. २, कंधार यांचे न्यायालयात**

**पिठासीन अधिकारी श्री. पी.डी.आझादे.**

**संक्षीप्त फौजदारी खटला.क्र. ३३५/२०२२** **नि.क्र. १०लगत**

**नमुना–अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन कंधार, ता.कंधार, जि. नांदेड. |
| उपस्थिती | सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता, श्री. हि.ज्ञा.रहाटे |
| आरोपी | भानुदास पि.प्रभाकर गुटटे<br>वयः– २६ वर्षे, व्यवसायः–ड्रायव्हर ,<br>रा.महालिंगी, ता.कंधार, जि.नांदेड |
| उपस्थिती | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.मुसळे |

**नमुना–ब**

| | |
|---|---|
| घटना दिनांक | दिनांक ३१/०७/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | दिनांक ०२/०८/२०२२ |
| दोषारोप/प्रतिकथन दिनांक | दिनांक ०६/०२/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | दिनांक २८/०२/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | ------------निरंक------------- |
| न्यायनिर्णय तारीख | दिनांक ०२/०५/२०२४ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | -----------निरंक---------------- |

## नमुना–क

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भानुदास प्रभाकर गुटटे | .. | दि.१४.०८.२०२२ रोजी सीआरपीसी कलम ४१ अ (१) प्रमाणे नोटीस दिली | भा.दं.वी. २७९, ४२७, | निर्दोष | निरंक | निरंक |

## नमुना–ड

## सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

### अ– सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | पंडीत भागवत ढगे | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.०२ | सागर सुर्यकांत डोंगरजकर | साक्षीदार |
| सा.क्र ०३ | बालाजी पि.नामदेव गुटटे | साक्षीदार |
| सा.क्र ०४ | गौरवकुमार पि. व्यंकटराव टाक | फिर्यादी |

### ब– बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क– न्यायालय साक्षीदार

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशानी कागदपत्रे

### अ–सरकारी

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र १२ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | निशाणी क्र.१५ | आर.सी.बुक |
| ३ | निशाणी क्र. १९ | तक्रार वरील सही |

### ब–बचावपक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क–न्यायालय

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### ड–जप्त मुद्देमाल

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (पारीत दिनांक ०२/०५/२०२४)

आरोपी हा भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि असे संबोधण्यात येइल) चे कलम २७९, व ४२७ कायद्या अंतर्गतचे खटल्यास सामोरे जात आहे.

२) **अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,**

दिनांक ०२/०८/२०२२ रोजी फिर्यादी गौरव कुमार व्यंकटराव टाक यांनी पोलीस स्टेशन कंधार या ठिकाणी हजर राहून तक्रार दिली की, तो दि.३१/०७/२०२०

रोजी त्याची कार स्वीप्ट डिझायर नं. एम.एच.१२,क्यू.जी.८४५६ ने नांदेड येथे त्याचा मित्र डॉ.नरेंद्र कजबे यांच्या परिवारामधील सदस्यांना लातूर येथे घेवून जात असतांना सकाळी १०.३० वा.दरम्याने ते माणसपुरी येथील महादेव मंदीराजवळ रस्त्यावर असतांना, त्यादरम्यान समोरुन ट्क नंतर एमएच २६ बी.ई–४२७९ हा ट्क त्याच्या चालकाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवित अणुन फिर्यादीच्या कारच्या उजव्या बाजुच्या साईडला जोराने धडक दिली. त्यामुळे फिर्यादीच्या कारचे रिअर बम्पर व कॉटर पॅनल तुटुन, फिर्यादीचे अंदाजे रुपये विस हजार रुपयाचे नुकसान झाले.

३) अशा आशयाच्या फिर्यादीच्या सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, कंधार यांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक २५१/२०२२ भा.द.वि. २७९, ४२७ अन्वये नोंदविण्यात आला. पुढील तपास पी.एस.आय.श्री.गनाचार्य यांच्याकडे सुपुर्द केला. संबंधीत साक्षीदारांचे बयाण नोंदविल्यानंतर आरोपी विरोधात सबळ पुरावे आढळुन आल्याने आरोपीविरूदध सदर न्यायालयात निशाणी क्र. १ द्वारे दोषारोप पत्र दाखल केले.

४) अंतिम अहवाल व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपी विरुध्द भा.द.वि. चे २७९, ४२७ च्या गुन्हयासाठी दोषारोप निशाणी १० नुसार निश्चित केले व ते आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीनी जबाणीमध्ये त्यांच्या विरोधात लावण्यात आलेला गुन्हा नाकारला असुन त्यांनी संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाच्या वतीने फिर्यादी व इतर एक साक्षीदार यांचा पुरावा नोंदविला. अभिलेखावर उपलब्ध फिर्यादीच्या पुराव्यात आरोपी विरोधात गुन्हा सदृश्य पुरावा आढळुन आल्याने त्याचे कलम ३१३ फौ.प्र.सं. चे बयाण निशाणी क्र.१० लगत नोंदविले, त्यामध्ये आरोपीने अभियोग पक्षाच्या वतीने नोंदविलेल्या साक्षीदारांचे बयान खोटे असल्याचे नमुद केले.

५) फिर्यादी पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. हि.ज्ञा.रहाटे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मुसळे यांच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावरुन खालील वादप्रश्न विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्रं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि. ३१/०७/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजताच्या दरम्यान महादेव मंदीराच्या बाजुला मानसपुरी ते नांदेड या सार्वजणिक रोडवर, मानसपुरी ता.कंधार, याठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्क क्र.एमएच–२६, बी.ई– ४३७९ हा मानवी जीवीतास धोका निर्माण होईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहोचविण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले व त्याव्दारे त्याने भा.द.वि. चे कलम २७९ अंतर्गत गुन्हा केला काय ? | **...नाही.** |
| २. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्क क्र. एमएच–२६, बी.ई– ४३७९ हा हयगई व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीच्या कारला धडक देवुन त्याव्दारे आगळीक केली व त्या योग्य फिर्यादीचे रुपये वीस हजार रक्कमेपर्यंत हानी अथवा नुकसान भरुन आले व त्याव्दारे त्याने भा.द.वि. चे कलम ४२७ अंतर्गत गुन्हा केला काय ? | **...नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीताः–**

६) मुददे क्र १ व २ हे ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे व एकाच घटनेशी संबंधीत असल्यामुळे त्यावर होणा–या संभावीत पुराव्यांचे वारंवारीता टाळण्याकरिता ते सर्व याठिकाणी एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

७) भारतीय दंड विधान चे कलम २७९, ४२७ चा गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास खालील घटक अभिलेखावर आणणे आवश्यक आहे –

**<u>कलम २७९ सार्वजनिक रस्त्यावर बेदरकारपणे वाहन चालविणे</u>**

अ) आरोपी हा अपघातातील वाहन चालवित होता,

ब) ते वाहन आरोपी हा सार्वजनिक रस्त्यावर चालवित होता,

क) आरोपी ते वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित होता,

ड) आरोपीचे वाहन चालविणे हे मानवी जीवीतास धोका पोहोचविण्याइतपत किंवा त्याद्वारे ईजा पोहोचविण्याइतपत पुरेसे कारणीभूत होते.

**<u>कलम ४२७ – पंन्नास रुपये इतक्या रक्कमेचे नुकसान करुन आगळीक करणे</u>**

अ) आरोपीने त्याच्या ताब्यातील वहान हायगाईने फिर्यादीचे नुकसान होण्याच्या उद्देशाने चालविले,

ब) आरोपीने त्याच्या ताब्यातील वहान चालवुन फिर्यादीच्या वहानाला धडक देवुन , त्याच्या कारचे नुकसान केले व त्याव्दारे त्याच्या कारची उपयुक्तता कमी केली.

क) आरोपीने वरील कृत्ये करुन फिर्यादीच्या कारचे रुपये वीस हजार रुपयाचे नुकसान केले.

८) आरोपीविरोधात लावण्यात आलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाच्या वतीने एकुण चार साक्षीदार तपासले. त्यापैकी फिर्यादी गौरवकुमार पि. व्यंकटराव टाक (स.सा.क्र.४) यांना निशाणी क्र. १० लगत तपासले. त्यामध्ये फिर्यादी गौरवकुमार याने कथन केले की, ते एम.एच.१२ क्यु.जी–८४५६ या क्रमांकाची स्वीप्ट डीजायर कार चालवित असतात. काही वर्षापुर्वी ते त्यांची कार मानसपुरी शिवारातुन रोडने घेवुन जात असतांना कंधारच्या दिशेने एक ट्क आला व त्याने त्याच्या कारला धडक दिली. त्यामुळे त्याच्या कारचे मागचे बंम्पर व दरवाजा पुर्णपेणे आतमध्ये गेला होता. त्यामुळे त्याच्या कारचे अंदाजे वीस हजार रुपयाचे नुकसान झाले होते. त्यांनी पुढे कथन केले की, सदर घटनेची तक्रार त्यांनी

पोलिस स्टेशन कंधार याठिकाणी दिली होती. त्यांना त्याच्या पुराव्यादरम्यान तक्रार दाखविली असता त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन करत, त्यावरील सही (नि.क्र. १९) फक्त त्यांनी ओळखली.

९) साक्षीदार गौरवकुमार यांना त्या ट्क बाबत व त्या ट्कच्या चालकाबाबत विचारले असता त्यांना त्याबाबत काहीही माहिती नसल्याचे कथन केले. न्यायालयात हजर असलेला आरोपी हा त्या ट्कचा चालक नसल्याचे स्पष्टपणे कथन फिर्यादी गौरवकुमार यांनी केले. अशा प्रकारे साक्षीदार हा सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्याचे आढळुन आल्याने, विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पुर्व परवानगीने साक्षीदाराचा उलट तपास नोंदविला परंतु, त्याचा कोणताही उपयोग आरोपी विरोधात गुन्हा सूर्दष बाबली अभिलेखावर आणण्यासाठी झालेला नाही. साक्षीदाराने त्याच्या उलट तपासात स्पष्ट शब्दात नाकारले की, ट्क नंबर एम.एच.२६–बी.ई. –४२७९ हा आरोपी भानुदास गुट्टे यांनी हयगईने व निष्काळजीपणे चालवित आणुन फिर्यादी चालवित असलेल्या कारला धडक दिली.

१०) अभियोग पक्षाच्या वतीने प्रकारणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सागर पि. सुर्यकांत डोंगरजकर (सा.क्र. २) यांना नि.क्र. १० लगत तपासले असता, सागर यांनी कथन केले की, दिनांक २१/०६/२०२२ रोजी ते व त्यांचे मित्र विक्की यन्नवार असे मिळुन सकाळी १०.०० वाजता मानसपुरी ते पांगरा मार्गे नांदेडला लात असतांना मानसपुरी शिवरात महादेश मंदीराजवळ मानसपुरी ते पांगरा रोडवर एक ट्क नंबर एम.एच.२६–बी.ई.–४२७९ हा मानसपुरीच्या दिशेने नांदेड मार्गे भरधाव वेगाने, हयगईने व निष्काळजीपणे त्याच्या चालाकाने चालवित आणुन कार क्र. एम.एच. १२– क्यु.जी– ८४५६ ला धडक दिल्याने त्या कारची मागची डॉमेज झाल्यामुळे तिचे अंदाजे वीस हजार रुपयाचे नुकसान झाले होते.

११) जरी, सागर यांनी त्यांच्या पुराव्यात वरील प्रमाणे कथन केले आहे ,परंतु, त्यानी त्याच्या उलट तपासात मान्य केले की, घटनास्थळावरील रस्ता हा खडया खुडयाचा आहे. असे असल्यास घटनास्थळावरुन खरोखरच सदरचा तथाकथीत ट्क भरधाव वेगानेवा चालविला किंवा केस ही बाब संशयास्पद असल्याचे दिसुन येते. केवळ साक्षीदाराने सदरचा ट्क भरधाव वेगाने जात होता असे म्हटल्याने तो ट्क खरोखरच भरधाव वेगात जात होता असे

ठोस पुराव्याशिवाय गृहीत धरात येणार नाही, त्यासाठी त्या ट्रकचा तांत्रीत अहवाल व कारचा तांत्रीक अहवाल अभिलेखावर असणे आवश्यक आहे. परंतु, असा कोणताही अहवाल जोकी, त्या ट्रकचा वेग सांगू शकेल असा उपलब्ध नाही.

**१२)** याबरोबरच, याठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, स्वतः फिर्यादीने त्याच्या कारला कोणत्या क्रमांकाच्या ट्रकने व त्या ट्रकचा चालक कोण होता यासंबधाने कोणतीही बाब त्याच्या पुराव्यात कथन केलेली नाही. त्यामुळे साक्षीदार सागर यांनी त्या तथाकथीत ट्रकचा नंबर व त्याच्या चालकाला केव्हा व कसे पाहिले याबाबत स्पष्टपणे कथन केलेले नाही, कारण फिर्यादीच्या पुराव्यात असे कुठेही आले नाही की, त्याच्या कारला धडक देणारा ट्रक घटनास्थळी थांबला किंवा कसे. अशा परिस्थीत साक्षीदार सागर याने त्या ट्रकच्या नंबर बाबत व त्या ट्रक चालकाबाबत ठोसपणे कथन करणे आवश्यक होते. परंतु, साक्षीदार सागर याने त्या संबंधाने अतिशय सहज कथन केलेले आहे, त्यामुळे खरोखरच साक्षीदार सागर याने फिर्यादीच्या कारला धडक दिलेल्या ट्रकच्या चालकाला व त्या ट्रकचा नंबर बघीतला किंवा कसे याबाबत ठोस मत तयार होउ शकत नाही, याउलट त्याबाबत संशय बळावतो.

**१३)** याबरोबरच अभियोग पक्षाच्या वतीने घटनास्थळ शाबीत करण्यासाठी, घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार नामे पंडीत पि. भागवत ढगे (सा.क्र. १) यांना नि.क्र. १० लगत तपासले असता, पंडीत याने कथन केले की, दिनांक ०२/०८/२०२२ रोजी सायकाळी ५.४५ वाजता पोलिसांनी मानसपुरी ते पांगरा रोडवर महादेव मंदीराच्या बाजुला रोडवर अपघात झाल्याच्या संबंधाने घटनास्थळ पंचनामा त्याच्या समोर नि.क्र. १२ लगत तयार केला आहे. जरी, पंडीत यांच्या म्हणण्याप्रमाणे पोलिसांनी त्याच्या समोर कारव ट्रकचा अपघात झाल्याच्या संबंधाने घटनास्थळाचा घटनास्थळ पंचनामा तयार केला परंतु, याठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, स्वतः फिर्यादीने आरोपी भानुदास हा ट्रक क्रमांक एम.एच.२६–बी.ई – ४३७९ हा कधीही हयगईने व निष्काळजीपणे चालवुन त्याची कार क्रमांक एम.एच.१२– क्यु.जी. –१४५६ ला धडक दिली नाही व त्याच्या कारचे नुकसान केले नाही असे कथन केलेले असत्यामुळे नि.क्र. १२ वरील घटनास्थळपंचनाम्याचा आरोपी विरोधात लावण्या आलेला दोषरोप शाबीत करण्यासाठी विशेष असा उपयोग होउ शकत नाही.

१४) नक्कीच, घटनास्थळ पंचनामा हा ठोस पुरावा नसुन तो ठोस पुराव्याच्या पुष्ठयार्थ पुरक पुरावा म्हणुन वापरला जावु शकतो. परंतु, याठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपीच्या विरोधात कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १२ ला आरोपीच्या विरोधात लावण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यासाठी एकमात्र पुरावा होउ शकत नाही.

१५) अभियोग पक्षाच्या वतीने आरोपी हा घटनेच्या दिवशी ट्क क्रमांक एम.एच.२६–बी.ई– ४२७९ हा चालवित असल्याची बाब सिध्द करण्यासाठी, त्या ट्कचा मालक बालाजी पि. नामदेव गुट्टे (सा.क्र. ३) यांना नि.क्र. १० लगत तपासले. बालाजी यांनी त्याच्या पुराव्यात स्पष्टपणे कथन केले की, घटनेच्या दिवशी त्याचा ट्क क्रमांक एम.एच.२६– बी.ई– ४२७९ हा आरोपी भानुदास गुट्टे चालवित नव्हता व तो ट्क मानसपुरी शिवरातुन पांगरा ते मानसपुरी मार्गे नांदेडला कधीही जात नव्हता. अशा प्रकारे साक्षीदार बालाजी ही सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्याचे आढळुन आल्याने, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पुर्वपरवानगीने साक्षीदार बालाजी यांचा उलट तपास नोंदविला परंतु, अभियोग पक्षास बालाजी यांचया पुराव्यात आरोपीच्या विरोधात गुन्हा सदृर्ष बाब अभिलेखावर आणण्यासाठी पुर्णपणे अपयश आलेले आहे.

१६) अशा प्रकारे वरील विवेंचनेचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोग पक्षाच्या वतीने आरोपीने तथाकथीत ट्क एम.एच.२६–बी.ई– ४२७९ हा हयगईने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या कार नंबर एम.एच.१२– क्यु.जी. – ८४५६ हिला धडक देवुन तिचे अंदाजे वीस हजार रुपयाचे नुकसान केले, यासंबंधाने कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आणलेला नसल्यामुळे, कलम २७९,४२७ भा.द.वि. च्या गुन्हयासाठी आवश्क असलेले घटक मिळुन येत नाहीत. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थीमध्ये नोंदवित आहे.

<u>मुददा क्र. ३ करीताः</u>–

१७) मुद्दे क्र १ व २ वरील निष्कर्षाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, ठोस पुराव्या अभावी अभियोग पक्षाला आरोपीं विरोधात लावण्यात आलेले गुन्हे शाबीत

करण्यासाठी अपयश आलेले आहे. त्यामुळे आरोपी हा सदरच्या प्रकरणातुन निर्दोष मुक्त होण्यासाठी पात्र आहे. करिता मुददा क्र. ३ च्या निष्कर्षा पोटी मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी भानुदास पि. प्रभाकर गुट्टे, रा.महालिंगी, ता.कंधार, जि.नांदेड यांना भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व ४२७ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने यापुर्वी सादर केलेले जातमुचलके व जामीन कदबा रदद समजण्यात यावे व जमानतदारास सदरच्या प्रकरणातुन मुक्त करण्यात यावे.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी आरोपीने रुपये १५,०००/–, (रुपये पंधरा हजार रुपये फक्त) चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा जो की, या न्यायालयात सादर केलेल्या तारखेपासुन पुढील सहा महिन्याकरीता अस्तित्वात राहील.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपी समक्ष घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by PRAVESH DUDHAJI AZADE
Date: 2024.05.08 17:51:05 +0530

( पी.डी.आझादे)

दिनांक – ०२/०५/२०२४

न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
कंधार

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sow. J. P. Ghogare |
| Name of Court | Court of 2nd Joint C.J.J.D & J.M.F.C. Kandhar |
| Date of Dictation | 02/05/2024 |
| Judgment signed by the P.O. on | 02/05/2024 |
| Judgment uploaded on | 04/05/2024 |